## हृदयाचा चुकतो ठोका

ती जादूभरले नयन रोखता, खुणावतो मज धोका
श्वासांची हलते धून आणिक, हृदयाचा चुकतो ठोका //
बोलत नाही ओठांनी ती, नजरच बोलत जाते
कळी फुलाची नकळत आणि सरसर उमलत जाते
धुंद गंध मग पसरत जातो साधून नेमका मौका
श्वासांची हलते धून, आणिक हृदयाचा चुकतो ठोका //
मी गारद येथे मूकपणाने, ना हाती कुठले अस्त्र
डोळ्यांचे बाण ती असे सोडता, हतबल-दुबळा-त्रस्त
मी पुसता कारण अशा लढ्याचे, ती अस्सा मारते मुरका
श्वासांची हलते धून, आणिक हृदयाचा चुकतो ठोका //
नयनबाण हे तिने सोडणे, नकळत माझे गारद होणे
हवीहवीशी अशी लढाई, ज्यातून खुलते अबोध गाणे
त्या गाण्याची ओळख पटता, प्रेमाचा झुलतो झोका
श्वासांची हलते धून, आणिक हृदयाचा चुकतो ठोका //
ती जादूभरले नयन रोखता, खुणावतो मज धोका
श्वासांची हलते धून आणिक, हृदयाचा चुकतो ठोका //

**प्रीती देशपांडे**